काय मी तुम्हाला सांगु नये, तुमच्यापैकी सज्जन कोण व दुर्जन कोण आहे?

हजरत अबु बरीराह रजिअल्लाहु अनहु कथन करतात की प्रेषित सल्लल्लाहु अलैही व सल्लम एकदिवस लोकं जमलेल्या ठिकाणी आले व त्यांनी फरमावीले: <> कथन करणारे सांगतात की:
सगळे जण चुपचाप बसले, प्रेषितांनी सल्लल्लाहु अलैही व सल्लम तिन वेळा हाच सवाल उपस्थितांना केला, मग एक व्यक्ती म्हणाला:हे प्रेषिता! आम्हाला अवश्य सांगा, आमच्या पैकी सज्जन कोण व दुर्जन कोण, त्यावर प्रेषितांनी सल्लल्लाहु अलैही व सल्लम फरमाविले:<>.
[صحيح] [رواه الترمذي]

प्रेषित सल्लल्लाहु अलैही व सल्लम आपल्या सहाबांकडे आले, आणी त्यांना प्रतिप्रश्न विचारला, मी तुम्हाला सज्जन व दुर्जना बाबत सांगु नये? या प्रश्नाच्या उत्तरात सहाबा चिडीचुप व भयभीत झाले, कदाचित सज्जन व दुर्जना बाबत माहिती झाल्यावर, एखाद्याच्या मानहानी च्या भितीपोटी ते सर्व चुपचाप बसले. प्रेषितांनी सल्लल्लाहु अलैही व सल्लम तिन वेळा सवाल केला, तेव्हा एका सहाबींनी नम्रतेने विचारले की, हो आम्हाला अवश्य सांगावे. तेव्हा प्रेषितांनी सल्लल्लाहु अलैही व सल्लम स्पष्ट केले:सज्जन तो व्यक्ती आहे, ज्याच्या कडुन लोकांना फक्त भलाई, चांगुलपणा व उपकारकता व सदाचाराची अपेक्षा असेल, आणी लोकं त्याच्या जुलुम व अत्याचारापासून व नुकसाना होण्या पासुन सुरक्षित राहतील, दुर्जन तो व्यक्ती आहे, ज्याच्या कडुन कोणत्याही भलाई ची अपेक्षा नसेल आणी लोकं त्याच्या जुलुम, अत्याचारा पासुन भयभित असतील.

http://sunnah.global/hadeeth/mr/show/66254